2 8 MAY 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अक्षर संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## राज्यभरातील कलाकारांकडून विविध प्रात्यक्षिके : शिवाजी विद्यापीठात तिसरे अक्षर संमेलन

प्रतिनिधी
कोल्हापूर

माझी शाळा माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाची सुरुवात डीजिटल कॅलीग्राफीने झाली. नाशिक येथील सचिन गडाख व सोलापूरचे अमित भोरखडे यांनी उपस्थितांना डिजिटल कॅलीग्राफीमध्ये देवनागरी व इंग्रजीसाठी ब्रश कसा निवडावा? याविषयी मार्गदर्शन केले.

मुंबई येथील ज्येष्ठ सुलेखनकार अनिल गोवळकर यांनी पेन्सील व ब्रश कॅलीग्राफीमधील दोष कसे टाळावे व उत्तमरीत्या सुलेखन कसे करावे? याविषयी प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन केले. ऋषिकेश उपळावीकर या तरुण कलाकाराने कॅरीकेचर करून उपस्थितांची वाहवा मिळविली. त्याचबरोबर हेमंत धरात (मुंबई) सचिन सावंत (मुंबई), श्रीकांत गवांडे (मुंबई) यांनी पपेर कॅलीग्राफी तर मोहन हिरुरकर (अमरावती) व गणेश माने (पुणे) यांनी लाईव्ह स्केच काढली. कोल्हापूरच्या अशांत माने यांनी तांदूळ व सुपारीवर काढलेली चित्रे आकर्षण ठरले. मुंबई येथील सुनील सूर्यवंशी या कलाकाराने शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटले.



कोल्हापूर : अक्षर संमेलनात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे रेखाचित्र रेखाटताना मुंबईचे कलाकार सुनील सूर्यवंशी.

दुपारच्या सत्रामध्ये सतीश उपळावीकर (कराड), मोहन कांबळे (कोल्हापूर), दीपक गोंधळे (अहमदनगर), महेंद्र शिरोडकर (गोवा) यांनी छत्रीवरील सुलेखन व रोल पेपर वरील प्रात्याक्षिके सादर केली. यावेळी व्यंकटेश भट (सहसचिव, गृहविभाग, मंत्रालय मुंबई), कैलास बिलोणीकर (सहसचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय) संजय इंगळे (सहसचिव, महसुल व वनविभाग महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAY 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठांतर्गत ५८१ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारपर्यंत ५८१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. सोमवारी झालेल्या ४ विषयांच्या परीक्षेला १ हजार ७८९ पैकी १ हजार ६४८ विद्यार्थी उपस्थित होते. तर १४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून प्रतिन्ही जिल्ह्यातून कॉपीच्या प्रकाराची एकही नोंद झालेली नाही. परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार परीक्षा होत आहेत. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.